**ठळक बातम्या**

- गणेशोत्सवाला सर्वत्र उत्साहाने प्रारंभ / राष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांच्या शुभेच्छा
- महाराष्ट्रात राज्यमहोत्सवानिमित्त विशेष उत्साह
- छोट्या चकमकींपासून ते वर्षांनुवर्षांच्या युद्धापर्यंत कोणत्याही प्रकारच्या संघर्षासाठी लष्कराला सतत सज्ज रहावं लागतं, असं संरक्षण मंत्र्यांचं प्रतिपादन
- क्रिकेटपटू रविचंद्रन आश्विन आयपीएल मधून निवृत्त

**आणि**

- जम्मूमधे कटरा वैष्णोदेवी मार्गावर दरड कोसळून अनेकांचा मृत्यू

**<><><><><>**

१० दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवाला आजपासून सुरुवात झाली असून घरोघरी तसंच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमधे गणेश मूर्तींची प्रतिष्ठापना होत आहे. देशात आणि परदेशातही हा सण उत्साहाने साजरा केला जात आहे.
राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गणेशोत्सवानिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. या सणातून नवीन ध्येयांसह सकारात्मकतेनं पुढे जाण्याची प्रेरणा मिळत असल्याचं राष्ट्रपतींनी संदेशात नमूद केलं आहे. तर, श्रद्धा आणि भक्तिभावानं भरलेला हा पवित्र सोहळा प्रत्येकासाठी मंगलदायी ठरो. गणरायाने आपल्या सर्व भक्तांना सुख, शांती आणि उत्तम आरोग्य द्यावे, अशी गणरायाकडे प्रार्थना, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

महाराष्ट्रात यंदा गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा मिळाल्यामुळे उत्साह द्विगुणित झालेला दिसत आहे.

मुंबईतल्या गणेशोत्सवाविषयी जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून…

**होल्ड-व्हीसी- अंकिता आपटे**

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२७ ऑगस्ट २०२५ - बुधवार

*ढोलताशांचा गजर आणि गणपतीबाप्पा मोरयाच्या जयघोषात आज मुंबईसह राज्यभरात मोठ्या उत्साहात गणरायाचं आगमन होत असून घरोघरी आणि सार्वजनिक ठिकाणी बाप्पा विराजमान होत आहे. मुंबईत सुमारे बारा हजार सार्वजनिक, तर सव्वा लाख घरगुती गणपतींची प्रतिष्ठापना केली जात आहे.*

*गणेशोत्सवाचा सण सुरक्षितरीत्या साजरा व्हावा, यासाठी मुंबई महानगरपालिकेनं चोख व्यवस्था केली आहे. बंदोबस्तासाठी मुंबई शहर आणि उपनगरात १७ हजार ६०० पोलीस तैनात करण्यात आले आहेत. तसंच निगराणीसाठी अकरा हजार कॅमेरेही लावण्यात आले आहेत. यंदा प्रथमच गणेशोत्सवात ड्रोन, तसंच एआय मॉनिटरिंग सिस्टिमचा वापर केला जात आहे.*

याखेरीज राजधानी दिल्ली, राजस्थान, मध्यप्रदेश, पुद्दुचेरी, कर्नाटक, आंध्रप्रदेश इथंही गणेशोत्सव वाजतगाजत सुरु झाल्याच्या बातम्या आमच्या वार्ताहरांनी दिल्या आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्यापासून जपान आणि चीनच्या अधिकृत दौऱ्यावर जाणार आहेत. ते जपानचे प्रधानमंत्री शिगेरू इशिबा यांच्याबरोबर १५ व्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होतील अशी माहिती परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी काल माध्यमांना दिली. चीनमध्ये, प्रधानमंत्री ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर रोजी तियानजिन इथं होणाऱ्या शांघाय सहकार्य संघटनेच्या राष्ट्रप्रमुखांच्या पंचविसाव्या बैठकीत सहभागी होतील.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत सुधारणा करण्याविषयीची चर्चा पुन्हा एकदा पुढे ढकलल्याबद्दल भारतासह जी फोर देशांनी नाराजी व्यक्त केली आहे. सुरक्षा परिषदेची रचना दुसऱ्या महायुद्धानंतरच्या राजकीय परिस्थितीत झाली होती, त्यावेळची भूराजकीय समीकरणं बदललेली असल्यानं त्यात बदल करावा तसंच सुरक्षा परिषदेत स्थायी सदस्य संख्या वाढवावी अशी मागणी भारत, ब्राझिल, जर्मनी आणि जपान हे देश दीर्घकाळपासून करत आहेत. मात्र काल १७ व्यांदा ही चर्चा पुढं ढकलली गेली. त्यावर जपानचे प्रतिनिधी इरिया ताकायुकी यांनी जी फोर देशांच्या वतीनं निषेध व्यक्त केला.

**<><><><><>**

छोट्या चकमकींपासून ते वर्षांनुवर्षांच्या युद्धापर्यंत कोणत्याही प्रकारच्या संघर्षासाठी लष्कराला सतत सज्ज रहावं लागतं, असं प्रतिपादन संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी केलं. ते मध्यप्रदेशात आर्मी वॉर कॉलेजमध्ये सुरु असलेल्या रण-संवाद उपक्रमात संबोधित करत होते. सध्याच्या अनिश्चित भूराजकीय परिस्थितीमुळे युद्धाला तोंड फुटणं किंवा ते थांबणं यांपैकी कशाचंही भाकित करता येत नाही असं ते म्हणाले.

**<><><><><>**

संरक्षण मंत्रालयानं आज दिल्लीत क्वालिटी काऊंसिल ऑफ इंडियाबरोबर एक सामंजस्य करार केला. या सामंजस्य कराराचा उद्देश ६३ लाखांहून अधिक माजी सैनिक आणि त्यांच्या कुटुंबांसाठी निवृत्ती वेतन , आरोग्यसेवा, पुनर्वसन आणि गुणवत्ता सेवा बळकट करणं हा आहे. या सामंजस्य करारांतर्गत माजी सैनिक कल्याण विभागाला डिजिटल मूल्यमापन तसंच पुराव्यावर आधारित धोरणांच्या शिफारशी करण्याच्या कामात क्वालिटी काऊंसिल ऑफ इंडिया मदत करेल. माजी सैनिक कल्याण विभाग राज्य सरकारं, जिल्हा सैनिक मंडळे, सैन्य दल मुख्यालयं आणि मान्यता प्राप्त रुग्णालयं यांच्या सोबत समन्वय साधण्याच्या कामात मदत करेल. या उपक्रमातून आरोग्यसेवा वितरण मजबूत होण्याबरोबर माजी सैनिकांसाठी पुनर्रोजगार उद्योजकतेच्या संधी वाढायला मदत होणार आहे. तसंच विभागाचा संस्थात्मक आराखडा बळकट व्हायला मदत होईल.

**<><><><><>**

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने गेल्या आठवड्यात पालघरमध्ये वायूगळतीने झालेल्या कामगारांच्या मृत्यूची आपणहून दखल घेतली आहे. तारापूर इथे औषधांच्या कारखान्यात नायट्रोजन वायूची गळती होऊन चार कामगार दगावले होते. यासंबधी प्रसिद्ध झालेल्या वृत्तांवरुन बेपर्वाईमुळे हे मृत्यू झाल्याचं दिसून येत

असल्याने आयोगाने राज्याचे पोलिस महासंचालकांना दोन आठवड्यात या बद्दलचा अहवाल सादर करण्यास सांगितलं आहे.

**<><><><><>**

क्रिकेटपटू रविचंद्रन अश्विनने आज आयपीएल अर्थात इंडियन प्रीमियर लीगमधून निवृत्तीची घोषणा केली. प्रत्येक सुरुवातीला एक अंत असतो, आपल्या आयपीएल कारकीर्दीचा आज शेवट झाला असं अश्विन समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हणाला. अश्विनने बीसीसीआय आणि आयपीएलच्या सर्व फ्रँचाईजचे आभार मानले.

अश्विनने २००९ ला चेन्नई सुपर किंग्जकडून आपल्या आयपीएल कारकीर्दीला सुरुवात केली होती. त्यानंतर त्याने रायजिंग पुणे सुपरजायंट्स, पंजाब किंग्ज, दिल्ली कॅपिटल्स, राजस्थान रॉयल्स या संघांचं प्रतिनिधित्व केलं. यावर्षी तो पुन्हा चेन्नई सुपर किंग्ज संघात परतला होता. आयपीएलमधे दीडशे बळी घेणारा अश्विन हा हरभनज सिंगनंतरचा दुसरा फिरकी गोलंदाज ठरला.

**<><><><><>**

यूएस ओपन टेनिस स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी महिला एकेरीच्या पहिल्या फेरीत माजी विजेती कोको गोफ हिला आयला ताम्यानोविच हिच्याविरुद्ध कडवी झुंज द्यावी लागली. तिसऱ्या, निर्णायक सेटपर्यंत रंगलेल्या या अटीतटीच्या सामन्यात कोको हिनं ६-४, ६-७, ७-५ असा विजय मिळवला. तर पुरुष एकेरीत टॉमी पॉल यानं एल्मर मोलर याच्यावर ६-३, ६-३, ६-१ अशी, तर अलेक्झांडर झ्वेरेव्ह यानं अलेजँद्रो ताबिलो याच्यावर ६-२, ७-६, ६-४ अशी सहज मात केली. इतर सामन्यांमध्ये अग्रमानांकित यानिक सिनर, इगा श्वियांतेक आणि नाओमी ओसाका यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यांना थेट सेट्समध्ये हरवून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरच्या कटरा भागात वैष्णोदेवी मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावर मुसळधार पावसामुळे दरडी कोसळून अनेकांचा मृत्यू झाला. केंद्रीय राखीव पोलिस दलाच्या मदतीनं बचावकार्य सुरू केलं असून, जखमींना कटरा इथल्या आरोग्य केंद्रात हलवण्यात आलं आहे. पुरस्थितीत अडकलेल्या भाविकांना लष्करांकडून मदत पुरवण्यात आली असून आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. दरम्यान, सततच्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं असून राज्य आणि केंद्रीय आपत्ती प्रतिसाद दल तसंच लष्कर निमलष्करी दलं आणि हवाई दलाचं बचावकार्य सुरु आहे. वीज,पाणीपुरवठा आणि दूरध्वनी सेवा पूर्ववत करण्याला प्राधान्य देण्यात येत असल्याचं केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंग यांनी सांगितलं. संबंधित भागातल्या शाळा महाविद्यालयांना आज सुट्टी देण्यात आली आहे. आवश्यक असेल तरच घराबाहेर पडावं असं आवाहन प्रशासनानं केलं आहे. जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग आज दुसऱ्या दिवशीही बंद ठेवण्यात आला आहे. जम्मू-कश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला आणि नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी शहा यांच्याशी चर्चा केली . प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

पंजाबमधे रावी, बियास आणि सतलज नद्यांच्या प्रवाहात वाढ होत असून पूरस्थिती निर्माण झाली आहे. रणजित सागर धरण आणि पोंग धरणांनी कमाल क्षमता गाठली असून गेल्या आठवड्यापासून भाक्रा धरणातून नियंत्रित पद्धतीनं पाणी सोडण्यात आलं. सखल भागात राहणाऱ्यांना सुरक्षित ठिकाणी किंवा मदत छावण्यांमध्ये जाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. बाधित क्षेत्रात अडकलेल्यांसाठी सेनादल, बीएसएफ, एनडीआरएफ आणि पंजाब पोलिसांची पथकं बचावकार्य करत असून

गरज असेल तिथं हेलिकॉप्टर्स तैनात करण्यात आली आहेत. येत्या ३० ऑगस्टपर्यंत सर्व शाळांना सुट्ट्या देण्यात आल्या आहेत.

//<><><><><>//